RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २५(४)] गुरुवार, ऑगस्ट ६, २०२६/श्रावण १५, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.**—महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. .. | १-२ |

दिनांक ३ ऑगस्ट, २०२६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुप्रिया धावरे,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ६ ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०२४ चा महा. ३५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील तक्त्यामध्ये, नोंद ४ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईलः- २०२४ चा महा. ३५.

| | |
|---|---|
| "५. ओपनएक्स इनोव्हेशन विद्यापीठ, मुंबई, कोहीनुर शैक्षणिक संकुल, कोहीनुर सिटी रोड, कुर्ला, मुंबई-४०००७०. | ओपन एज्युकेशन स्कील टेक फाऊंडेशन, सीआयएन क्रमांक यू८०९०३एमएच२०२२ एनपीएल३९५६०७ यांचे फ्लॅट नं. ए/५, एव्हरार्ड सीएचएस लिमीटेड, पूर्व द्रुतगती महामार्ग, सायन, मुंबई-४०००२२ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) अंतर्गत नोंदणीकृत कंपनी.". |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.